# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
**शासन निर्णय क्रमांकः** झेडपीए-२०२१/प्र.क्र.४५/वित्त-९
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१
तारीख: २० सप्टेंबर, २०२४.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/वित्त-९, दि.२५ मार्च, २०१५
२) शासन शुध्दीपत्रक, ग्रामविकास विभाग, क्रमांक : झेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/वित्त-९, दि.२३ फेब्रुवारी, २०१८
३) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक : निविदा-२०१४/प्र.क्र.२६०/पंरा-७, दि.२७ मे, २०१५
४) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक : निविदा-२०१४/प्र.क्र.२६०/पंरा-७, दि.२७ मे, २०१५
५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक : भांखस-२०२१/प्र.क्र८/उद्योग-८, दि.७ मे, २०२१
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान), क्रमांक : मातंसं-०५४/३१/२०१६/३९, दि.११ मे, २०२१
७) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक : निविदा-२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४, दि.२७ मे, २०२१
८) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक : ग्रासयो-२०२०/प्र.क्र.७०/बांधकाम-२, दि.०५ एप्रिल, २०२३
९) शासन निर्णय शुध्दीपत्र,सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक : सीएटी-०१/२०१५/प्र.क्र.२०/इमा.२, दि.२९ जुलै, २०२१

**प्रस्तावना :-**

ग्रामपंचायत संस्थांचे बळकटीकरण करणे तसेच ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्टया सक्षम करणे याकरीता शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतींनी करावयाची विकास कामे व ग्रामपंचायतींच्या हद्दीत ग्रामपंचायतींबरोबर इतर यंत्रणांनी करावयाची कामे याबाबत शासन निर्णय, दि.२५ मार्च २०१५ तसेच शासन शुध्दीपत्रक, दि.२३ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

दरम्यान उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय, दि.०१ डिसेंबर, २०१६ व सुधारीत शासन निर्णय दि.०७ मे, २०२१ रोजी निर्गमित झालेला असून, सदर शासन निर्णयान्वये दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रु.३ लाखावरुन रु.१० लाखापर्यंत सर्व कर अंतर्भूत करुन वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, रु.१० लाख व त्यापुढील खरेदीसाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन निर्णय, दि.११ मे, २०२१ रोजी निर्गमित केला आहे. ग्रामविकास विभागाकडूनही शासन निर्णय दि.२७ मे, २०१५ व दि.२७ मे, २०२१ नुसार सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयातील सुधारणांच्या अनुषंगाने "ग्रामपंचायत विकास कामांबाबत विभागाकडून निर्गमित शासन निर्णय, दि.२५ मार्च, २०१५ तसेच शासन शुध्दीपत्रक दि.२३ फेब्रुवारी, २०१८" मधील तरतुदी यामध्ये सुधारणा होणे आवश्यक असल्याबाबत विविध जिल्हा परिषदांकडून/ लोकप्रतिनिधींकडून विचारणा होत आहे. सदर सुधारणा विचारात घेऊन या विषयाचे संदर्भाधीन अ.क्र.१ व २ येथील उपरोक्त शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

**शासन निर्णय :-**

ग्रामपंचायत "एजन्सी" म्हणून विकास कामे करताना खालीलप्रमाणे त्यांचे उत्पन्न असणे आवश्यक असून त्या उत्पन्नानुसार :

१) **वित्तीय मर्यादा** :

१.१) रु.७५,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना रु.१०,००,०००/-

१.२) रु.७५,००१/- च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना रु.१५,००,०००/- पर्यंतच्या रकमेची कामे करता येतील.

२) **<u>ग्रामपंचायतींनी करावयाची कामे</u>**

२.१) जी कामे ग्रामपंचायतींनीच कायद्याप्रमाणे करणे बंधनकारक आहे ती कामे (उदा.MGNREGA-खाली किमान ५०% काम),

२.२) ग्रामपंचायतींना प्राप्त होणा-या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीतील कामे.

२.३) जी कामे ग्राम पंचायतींनीच करावीत असे केंद्र शासनाच्या योजनेमध्ये अंतर्भूत असतील अशी कामे.

२.४) तसेच त्यांच्या स्व:निधीतील जी कामे ग्रामपंचायती मार्फतच केली जातील अशी कामे.

**३)** याशिवाय, अन्य जी कामे ग्रामपंचायत मार्फत ग्रामपंचायत प्रत्यक्ष काम करणारी “एजन्सी” म्हणून कार्यान्वित असतील अशी कामे उपरोक्त १ येथील मर्यादेपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतींना खालील अटींच्या अधीन राहून करता येतील.

३.१) ग्रामपंचायतींनी त्यांच्या गावठाण्याच्या हद्दीतील मुलभूत सुविधेची कामे/विकास कामे करावीत.

३.२) गावाशी निगडीत असलेली कामे उदा.शाळा-इमारत, समाज मंदिर, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्र यासारखी कामे गावठाण्याच्या हद्दीबाहेर असली तरी ग्रामपंचायतींना करता येतील.

४) **<u>ई-निविदा कार्यप्रणालीबाबत</u>** :-

४.१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : भांखस-२०२१/प्र.क्र.८/उद्योग-८, दि.७ मे, २०२१ तसेच सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन निर्णय क्रमांक : मातंस-०५४/३१/२०१६/३९, दि.११ मे, २०२१ व ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक : निविदा-२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४, दि.२७ मे, २०२१ नुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकास कामांच्या रु.१० लक्ष ( सर्व कर अंतर्भूत करुन ) रक्कमेवरील कामांकरीता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे अनिवार्य राहिल.

४.२) सदर शासन निर्णयात परिच्छेद २ व ३ येथे विहित केलेली कामे करण्यास ग्रामपंचायतींनी असमर्थता दर्शविली असेल, अशी उपलब्ध होणारी कामे ही ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : ग्रासयो-२०२०/प्र.क्र.७०/बांधकाम-२, दि.०५ एप्रिल, २०२३ नुसार संबंधित जिल्हा परिषदांनी २६:४०:३४ या प्रमाणात मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार त्या त्या गटांतर्गत निकोप स्पर्धा निर्माण होईल अशापध्दतीने कामवाटप ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन देणे बंधनकारक राहील.

**५) <u>इतर मार्गदर्शक सूचना</u>:**

५.१) ग्रामपंचायतीं मार्फत करावयांच्या कामांना सक्षम प्राधिकारी यांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

५.२) या कामांची तांत्रिक तपासणी, कामाची मोजमापे, अभिलेख्यांची नोंदणी अशी अनुषंगिक कामे जिल्हा परिषद/पंचायत समितीचे शाखा अभियंता/उप अभियंता/कार्यकारी अभियंता हे पाहतील.

५.३) ग्रामपंचायत पुढील ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतींनी केलेल्या कामांची संपूर्ण माहिती सादर करेल.

**६) इतर एजन्सी/यंत्रणेचे अधिकार व जबाबदारी :**

६.१) वेगवेगळ्या योजनांमधून ग्रामपंचायत क्षेत्रात कार्यान्वयीत करण्यात यावयाची अन्य सर्व कामे संबंधित प्रशासकिय विभाग ज्या कार्यान्वयीन एजन्सी/यंत्रणेमार्फत करुन घेऊ इच्छितो त्या कार्यान्वयीन एजन्सी/यंत्रणेमार्फत करु शकतील.

६.२) तथापि, लोकप्रतिनीधी स्थानिक विकास कार्यक्रम तसेच विविध प्रकल्पातून किंवा शासनाच्या विविध योजनेतून ग्रामपंचायत हद्दीमध्ये इतर एजन्सी / यंत्रणेमार्फत करण्यात येणाऱ्या विकास कामांची माहिती ग्रामपंचायतीस अवगत करणे संबंधित यंत्रणांना बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०९१९१४३२२२५१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJESH PRABHAKAR BHOIR

Digitally signed by RAJESH PRABHAKAR BHOIR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=1b7e6616195233808d0e995e9882ef4484d9f347b08c606d67de4c46aeb159da, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=483E7CEB4E1E9152BBF665505F0B1C60A9BE486C39888B389F5CFC9BC7493334, cn=RAJESH PRABHAKAR BHOIR
Date: 2024.09.20 12:50:06 +05'30'

**(रा.प्र.भोईर)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
४. सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
५. मा. विधान सभा/विधान परिषद सदस्य
६. महालेखाकार (स्थानिक संस्था) महाराष्ट्र -१, मुंबई (पाच जादा प्रतीसह)
७. महालेखाकार (स्थानिक संस्था) महाराष्ट्र -२, नागपूर (पाच जादा प्रतीसह)
८. वित्त विभाग व्यय-१५ व अर्थसंकल्प-१९
९. सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
१०. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
११. संचालक तथा मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई

१२. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती.
१३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१५. सर्व जिल्हा उप मुख्य लेखापरिक्षक अधिकारी, स्थानिक निधी लेखा
१६. सर्व सहसचिव / उपसचिव, ग्राम विकास विभाग
१७. सर्व कार्यासन अधिकारी, ग्राम विकास विभाग
१८. निवड नस्ती